न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, पातुर, जि.अकोला यांचे न्यायालयात
राष्ट्रीय लोक अदालत — दिनांक ३०.०४.२०२३.
गुन्हयाचा तपशिल

सं.फौ.खटला क्र. 607/२०22 सरकार विरुध्द अशोक नि.क्र.—

१. अपराध घडल्याची तारीख :— 6/10/22
२. अहवालाचा/फिर्यादची तारीख :— 6/10/22
३. फिर्यादीचे नांव :— पोलीस स्टेशन अधिकारी, पातुर/चान्नी
४. आरोपीचे नांव, वय व पत्ता :— अशोक मकराम राठोड
रा. बेलतळा, ता. पातुर

५. आरोपीचे प्रतिकथन :— तुम्ही दिनांक 6/10/22 रोजी 15:25 वाजताच्या दरम्यान बेलतळा फाटा येथे तुम्ही सार्वजनीक ठिकाणी जुगार खेळतांना आढळुन आला व अशाप्रकारे तुम्ही महाराष्ट्र जुगार बंदी कायदा कलम १२अ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रश्न १: तुम्हाला तुमचे विरुध्द दाखल झालेल्या खटल्याचे कागदपत्र मिळाले काय?

उत्तर : होय.

प्रश्न २: तुम्हाला तुमचेवर ठेवण्यात आलेला अपराध वाचुन दाखविला तो तुम्हास समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३: तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर : होय.

दिनांक :—३०.०४.२०२३.

अशोक मराठोड

समक्ष,

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पातुर

आरोपीची सही

आरोपी हा आज न्यायालयापुढे हजर असून आरोपीने त्यांचे विरुध्द नोंदविण्यात आलेला गुन्हा स्वेच्छेने कबूल केलेला आहे. आरोपीने सदरचा गुन्हा स्वेच्छेने कबूल केल्यानंतर त्याबाबत होणा–या शिक्षेबाबत त्याला स्पष्टीकरण विचारले असता, त्याने निवेदन केले की, त्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाकीची असून मोलमजूरी करून तो स्वतःचा चरितार्थ चालवितो. आरोपी हा त्याच्या कुटूंबातील कमाविता असून आरोपीच्या कुटूंबातील लोक आरोपीवर व आरोपीच्या कमाईवर अवलंबून आहेत. त्यामुळे आरोपीने कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली. विद्वान सरकारी वकिलांनी युक्तीवाद केला की, गुन्हयाचे स्वरूप व आरोपीचे निवेदन लक्षात घेता योग्य तो आदेश पारीत करावा. आरोपी विरुध्दच्या गुन्हयांचे स्वरुप, त्याने मांडलेले म्हणणे विचारात घेता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी ........ अशोक मकराम राठोड ........
..........
..........
..........
यास महाराष्ट्र जुगार बंदी कायदा कलम १२अ अन्वये शिक्षापात्र असणा–या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये दोषी धरण्यात आलेले असून त्यास सदर गुन्हयासाठी (एकापेक्षा जास्त आरोपी असल्यास प्रत्येकी) रक्कम रुपये २००/– फक्त (रुपये दोनशे मात्र) द्रव्यदंडाची शिक्षा तसेच द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास, विस दिवसांची साध्या कैदेची शिक्षा याद्वारे ठोठावण्यात येत आहे.

२. नगदी रक्कम जप्त केली असल्यास अपील कालावधीनंतर सरकार जमा करण्यात यावी.

३. मुद्येमाल जुगार साहित्य जप्त केले असल्यास मुल्यहिन असल्यास अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

४. मुद्येमाल वाहन/मोबाईल जप्त केले असल्यास, सुपूर्दनाम्यावर दिले असल्यास सुपूर्ददार यांनी अपील कालावधीनंतर त्यांचेकडे ठेवुन घ्यावे आणि सुपूर्दनाम्यावर दिलेले नसल्यास मुळ मालकाला परत करण्यात यावे व तसे करुनही कोणीही मागणी न केल्यास अपील कालावधीनंतर जाहिर लिलाव करुन आलेली रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

FR.No.139
dt.30/4/23
Fine Rs. 200/-
[signature] 30/4/23

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पातुर.

दिनांक : ३०.०४.२०२३.